|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

Umavinagar, Jalgaon - 425 001, (M.S.) INDIA

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)


जा.क्र.उमवि/११/पीएच.डी./संशोधक मार्गदर्शक/४२९/२०२६ दि. ०९/०४/२०२६

प्रति,

**१) कबचौउमविशी सबंधित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व मान्यताप्राप्त परीसंस्थांचे मा. संचालक,**
**२) मा.संचालक/विभागप्रमुख, विद्यापीठातील सर्व प्रशाळा/विभाग कबचौउमवि जळगाव.**
**३) मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, कबचौउमवि जळगाव.**

**विषय:- संशोधक मार्गदर्शक यांची यादी अद्ययावत करणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने एप्रिल २०२५ मध्ये संशोधक मार्गदर्शक यांची यादी रिक्त जागांसह प्रसिध्द केली आहे. तदनंतर काही शिक्षकांना नव्याने संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच पेट २०२४ मधील विद्यार्थ्यांना संशोधक मार्गदर्शक वाटप झाले आहे, काही संशोधक मार्गदर्शक सेवानिवृत्त/मयत झाले आहेत, दरम्यानच्या काळात काही विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याने मार्गदर्शक यांच्याकडील जागा रिक्त झाल्या आहे, काही मार्गदर्शक यांना उन्नत अभिवृध्दी योजनेअंतर्गत वरीष्ठ पदावर पदोन्नती झाली आहे. मार्गदर्शक यांनी OAASIS च्या Portal वरून त्यांच्या Login मधुन माहिती न भरल्याने वा वेळोवेळी माहिती अद्ययावत न केल्याने अचूक रिक्त जागांचा तपशील उपलब्ध होऊ शकत नाही. त्यासंदर्भात काही मार्गदर्शकांनी विद्यापीठाकडे वेळोवेळी विचारणा करीत असतात.

त्यासंदर्भात यापत्राव्दारे, संशोधक मार्गदर्शक यांनी OAASIS च्या Portal मधुन त्यांच्या Research Guide च्या Login मधून त्यांची माहिती दि.२३/०४/२०२६ पर्यंत https://phd.onlinekbcnmu.org.in/pet2024/index.php या Link वरून त्यांच्या Research Guide च्या Login मधून अद्यावत करून घावी. **जे संशोधक मार्गदर्शक आपली माहिती अद्यावत करणार नाहीत त्यांना पेट-२०२६ च्या विद्यार्थ्यांना संशोधक म्हणून Allot करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर Link ही दि. १३/०४/२०२६ पासून दि. २३/०४/२०२६ पर्यंत कार्यान्वीत असेल.**

ज्या संशोधक मार्गदर्शकांकडून त्यांचा Login व Password गहाळ झाला असेल त्यांनी वरील Link वर Click केल्यावर Forgot password-Ph.D.Guide या Link वर Click केल्यावर विचारणा केलेली माहिती भरल्यावर त्यांच्या Screen वर अथवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर SMS द्वारे Login व Password उपलब्ध होऊ शकेल. यापुर्वी ज्या संशोधक मार्गदर्शक यांनी त्यांच्या OAASIS च्या PORTAL मधुन त्यांची माहिती भरली आहे. ती माहिती पुनःश्च त्यांच्या LOGIN मध्ये उपलब्ध आहे, **त्यात ज्या संशोधक विद्यार्थ्यांची पीएच.डी. पदवी चे Notification निर्गमित झाले आहे त्यांची नावे Delete करण्यात यावी व सदर माहितीची खातरजमा केल्यावर Submit व Done या ICON वर Click करावे, त्याशिवाय सदरची माहिती विद्यापीठाच्या Login मध्ये उपलब्ध होणार नाही.**

तसेच ज्या संशोधक मार्गदर्शकाची उन्नत अभिवृध्दी योजने अंतर्गत वरीष्ठ पदावर पदोन्नती झाली असेल त्यांनी विद्यापीठाकडून मान्यता मिळल्याची प्रत pvcresearch@nmu.ac.in या ई-मेल वर व **हार्डकॉपी प्रमाणीत करून** विद्यापीठात पाठवावी, त्याशिवाय OAASIS च्या PORTAL वर माहिती अद्ययावत होणार नाही. PET-२०२६ प्रवेश प्रक्रिया Online झालेली असल्याने ज्या संशोधक मार्गदर्शक यांची माहिती Portal वर उपलब्ध असेल त्यांनाच Portal वर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे PET-२०२६ चे संशोधक विद्यार्थी Allot होतील **जे संशोधक मार्गदर्शक Portal वर माहिती भरणार नाहीत, त्यांना PET-२०२६ चे संशोधक विद्यार्थी Allot होणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.**

..२

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

Umavinagar, Jalgaon - 425 001, (M.S.) INDIA

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)



तसेच मा.प्राचार्य/संचालक यांना विनंती की, त्यांच्या आस्थापनेवरील जे शिक्षक सेवानिवृत्त/मृत झाले आहेत तसेच, जे नजिकच्या काळात ( जुन २०२८ ) पर्यंत सेवानिवृत्त होणार आहेत त्या संशोधक मार्गदर्शक यांची **माहिती दि. २३/०४/२०२६ पर्यंत विद्यापीठात संशोधन विभागात सादर करावी.**

आदेशान्वये,

सहा.कुलसचिव (अ.का.)

**महत्वाची सुचना:-** **जे संशोधक मार्गदर्शक Portal वर माहिती अद्ययावत करणार नाहीत, अशा मार्गदर्शकांची मार्गदर्शक यादी मध्ये नाव समावेश न झाल्यास किंवा रिक्त जागांचा तपशील अद्ययावत न झाल्यास त्यास संबंधित मार्गदर्शक स्वत: जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.**

--------XXX-----